जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

1 1 AUG 2017 तरूण भारत

# पुढील आठवड्यात कच्ची यादी होणार जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

नवीन विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठ निवडणूक प्रक्रिया राबवली जाणार आहे. पदवीधर नावनोंदणी ३१ जुलैअखेर पूर्ण झाली असून, सध्या अर्ज छाननी प्रक्रिया सुरू आहे. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात अर्ज छाननी प्रक्रिया पूर्ण व्हायला हवी होती, मात्र विलंबाने का होईना येत्या तीन दिवसात छाननी होऊन पुढील आठवड्यात कच्ची यादी जाहीर होणार आहे.



- विद्यापीठ प्रशासन निवडणुकांसाठी सज्ज
- विद्यार्थी संघटनांच्या बैठकांना जोर

यादीसंदर्भात तक्रारींचे निरसन झाल्यानंतर निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या जातील. विद्यापीठ प्रशासन निवडणुका घेण्यासाठी सज्ज आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

४५ दिवसात निवडाणुकांचे कामकाज पूर्ण करून शासनाला अहवाल सादर करावयाचा आहे. त्यामुळे मतदार अर्ज छाननी प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. तीनवेळा मतदार नाव नोंदणीसाठी मुदतवाढ देण्यात आली असली, तरी मतदार नोंदणी म्हणावी तशी झालेली नाही. २०१७–१८ या शैक्षणिक वर्षातील सर्व परिषदांसाठीचे परिनियम विद्यापीठांना प्राप्त झाले आहेत.

विद्यार्थी संघटनांच्या बैठकांनी चांगलाच जोर धरला आहे. त्याचबरोबर उमेदवारांची चाचपणीही सुरू आहे. यावर्षीच्या निवडणुकांसाठी विद्यार्थ्यांना मतदानाचा अधिकार असल्यामुळे निवडणुकांना रंगत येणार आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने जास्तीत जास्त पदवीधर उमेदवारांशी संपर्क साधला आहे. काही विद्यार्थी संघटनांची एकत्र लढण्याची तयारी सुरू आहे. १९ हजार पदवीधरांनी तर ३ हजार प्राध्यापकांनी नावनोंदणी पूर्ण केली आहे.

संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याबरोबर मुंबई येथे सर्व अकृषी विद्यापीठांच्या कुलसचिवांची निवडणुकीच्या कामातील संदिग्धता किंवा अडचणी दूर करण्याबाबत २९ जूनला झालेल्या बैठकीमध्ये यापूर्वी मतदार नोंदणी केलेल्या पदवीधरांकडून परिनियमानुसार रहिवासी दाखल्याचा पुरावा घेण्यात यावा, असा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार पदवीधर मतदारांकडून रहिवासी दाखल्याचा पुरावा घेऊन त्यांचे अर्ज अद्ययावत करण्याचे काम पूर्ण झाले आहे.

कच्च्या यादीसंदर्भात आलेल्या हरकतींची पुर्तता करून पक्की मतदार यादी ऑनलाईन प्रसिध्द होणार आहे. विद्यापीठ निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी विद्यापीठ प्रशासन, विद्यार्थी संघटना, प्राध्यापक, संस्थापक, प्राचार्य यांचे प्रयत्न सुरू आहेत.

1 1 AUG 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा स्वच्छतेचा वसा

## पुतळ्यांसह २८ ठिकाणी सफाई; सुमारे १६० किलो प्लास्टिक संकलन

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**



शिवाजी विद्यापीठाने शहर स्वच्छतेप्रती आपली बांधिलकी जोपासताना क्रांतिदिनानिमित्त शहरातील विविध पुतळ्यांच्या परिसरासह मध्यवर्ती बसस्थानक आणि रेल्वेस्थानक परिसरात व्यापक स्वच्छता मोहीम राबविली. विद्यापीठ तसेच महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) माध्यमातून बुधवारी ८ ते ११ या कालावधीत रोटरी क्लब ऑफ करवीर, रोटरी चॅरिटेबल ट्रस्ट आणि कोल्हापूर महापालिकेच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. उपक्रमात एक हजारांहून अधिक एनएसएसचे स्वयंसेवक सहभागी झाले. मोहिमेंतर्गत प्लास्टिक कचरा संकलनावर भर देण्यात आला. घनकचरा, काचसामान याशिवाय शहरातून सुमारे १६० किलो प्लास्टिक कचरा वेचण्यात आला.

मध्यवर्ती बसस्थानक परिसरापासून या मोहिमेची सुरुवात करण्यात आली. या ठिकाणी जमलेल्या विद्यार्थ्यांना स्वच्छतेविषयी संबोधित करून प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी मोहिमेस प्रारंभ केला. 'शिवाजी विद्यापीठातर्फे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छ कोल्हापूरसाठी सातत्यपूर्ण मोहिमा राबविण्यात येत आहेत. सार्वजनिक ठिकाणे, राष्ट्रपुरूषांच्या प्रतिमा यांच्या स्वच्छतेबरोबरच मनाच्या स्वच्छतेचाही संस्कार मोहिमेच्या माध्यमातून रुजविला जाण्याची गरज आहे,' असे मत डॉ. शिर्के यांनी व्यक्त केले. बसस्थानक परिसरासह रेल्वे स्थानक परिसरात डॉ. शिर्के यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी विद्यार्थ्यांसमवेत स्वच्छता करण्यात पुढाकार घेतला. यावेळी स्वच्छतेनंतर प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह सर्व अधिकाऱ्यांनी शहरातील सर्व पुतळ्यांना पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी विद्यार्थ्यांना एनएसएस विभाग आणि रोटरी क्लबतर्फे पुनर्प्रक्रियेसाठी प्लास्टिक गोळा करण्यास स्वतंत्र थैल्या, हातमोजे, मास्क उपलब्ध करून देण्यात आले. या मोहिमेत कोल्हापूर बसस्थानकाचे आगारप्रमुख सुनील शिंदे, वाहतूक नियंत्रक आर.बी. मोगे, विजय फाळके, रोटरी क्लबचे एस.एन. पाटील, विशाळ जांभळे, प्रमोद चौगुले, ज्ञानदेव केसरकर, हरेष पटेल, कुशल पटेल, मनोज कोळेकर, शीतल दुग्गे, किरण खटावकर, काशीनाथ सांगावकर यांच्यासह शहरातील विविध महाविद्यालयांचे एनएसएसचे समन्वयक यांनी हे महास्वच्छता अभियान यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

1 1 AUG 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रांती दिनानिमित्त पुतळे झाले चकाचक

## विद्यापीठाचा उपक्रम : एक हजारहून अधिक एनएसएसचे स्वयंसेवक सहभागी

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठातर्फे क्रांती दिनानिमित्त शहरातील विविध पुतळ्यांच्या परिसरासह मध्यवर्ती बस स्थानक, रेल्वे स्थानक परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. विद्यापीठ व महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) माध्यमातून सकाळी आठ ते अकरा दरम्यान रोटरी क्लब ऑफ करवीर, रोटरी चॅरिटेबल ट्रस्ट आणि महापालिकेच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. उपक्रमात एक हजाराहून अधिक एनएसएसचे स्वयंसेवक सहभागी झाले. या मोहिमेंतर्गत प्लास्टिक कचरा संकलनावर भर देण्यात आला. घनकचरा, काचसामान याव्यतिरिक्त शहरातून सुमारे १६० किलो प्लास्टिक कचरा गोळा करण्यात आला.

आज सकाळी आठ वाजता मध्यवर्ती बस स्थानक परिसरापासून या स्वच्छता मोहिमेची सुरवात झाली. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी या मोहिमेस प्रारंभ केला. बस स्थानक परिसरासह रेल्वे स्थानक परिसरात डॉ. शिर्के यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी विद्यार्थ्यांसमवेत स्वच्छता करण्यात पुढाकार घेतला. या वेळी स्वच्छतेनंतर प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह सर्व अधिकाऱ्यांनी शहरातील सर्व पुतळ्यांना पुष्प अर्पण करून अभिवादन केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित स्वच्छता मोहिमेत सहभागी विद्यार्थी.**

विद्यार्थ्यांना एनएसएस विभाग आणि रोटरी क्लबतर्फे पुनर्प्रक्रियेसाठी प्लास्टिक गोळा करण्यास स्वतंत्र थैल्या, हातमोजे, मास्क उपलब्ध करून देण्यात आले. मोहिमेत कोल्हापूर बस स्थानकाचे आगारप्रमुख सुनील शिंदे, वाहतूक नियंत्रक आर. बी. मोगे, विजय फाळके, रोटरी क्लबचे एस. एन. पाटील, विशाळ जांबळे, प्रमोद चौगुले, ज्ञानदेव केसरकर, हरेष पटेल, कुशल पटेल, मनोज कोळेकर, शीतल दुगे, किरण खटावकर, काशीनाथ सांगावकर यांच्यासह शहरातील विविध महाविद्यालयांचे एन. एस. एस.चे समन्वयक यांनी मोहीम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

बिंदू चौक, शिवाजी चौक- देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स आणि नाईट कॉलेज, कोल्हापूर, पैलवान खाशाबा जाधव (भवानी मंडप, महालक्ष्मी मंदिर) व संत गाडगेबाबा (जोतिबा रोड)- डॉ. डी. डी. शिंदे सरकार महाविद्यालय, राजमाता जिजाऊ (गंगावेस) व डॉ. बाबासाहेब आंबेडकर (कोल्हापूर महानगरपालिका)- यशवंतराव चव्हाण केएमसी महाविद्यालय, देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार (राजारामपुरी) व रेल्वे स्टेशन- कमला महाविद्यालय, छत्रपती शाहू महाराज (दसरा चौक) व छत्रपती राजाराम महाराज (व्हीनस कॉर्नर), आईसाहेबांचा पुतळा (अयोध्या टॉकीजजवळ) व श्रीपतराव बोंद्रे (गोकुळ हॉटेल) - श्री शहाजी महाविद्यालय, बस स्थानक, ताराराणी पुतळा (कावळा नाका), राजीव गांधी (वटेश्वर मंदिराजवळ)- राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, आईचा पुतळा (माऊली चौक)- राजाराम महाविद्यालय, जी. कांबळे (हुतात्मा पार्क) गोखले महाविद्यालय, महात्मा गांधी (गांधी मैदान) व शिवाजी महाराज अर्धपुतळा- न्यू कॉलेज, न्यू पॅलेस (महावीर गार्डन), जिल्हाधिकारी कार्यालय, महावीर महाविद्यालय, जिल्हा परिषद परिसर, आरटीओ कार्यालय व इरिगेशन चौक परिसर, विवेकानंद महाविद्यालय, शाहू महाराज जन्मस्थळ, बावडा परिसर, सेंट्रल बिल्डिंग परिसर- डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कसबा बावडा, आर. के. नगर, गणपती मंदिर परिसर- भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी ॲन्ड इंजिनिअरिंग, राष्ट्रीय रस्ते महामार्ग, शाहू नाका, उड्डाणपूल, केआयटी कॉलेज, कणेरी मठ परिसर, धनंजय महाडिक ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, विकासवाडीसह विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज, बापूजी साळुंखे, डॉ. आप्पासाहेब पवार, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्यांची विद्यापीठ अधिविभागांमार्फत स्वच्छता केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 AUG 2017
सकाळ

# मुंबई विद्यापीठाच्या निकालांना प्राधान्य : डॉ. देवानंद शिंदे

मुंबई, ता. १० : ऑनस्क्रीन असेसमेंटचा गोंधळ, पुढे सरकत चाललेली तारखांची मुदत, हरवलेल्या उत्तरपत्रिका या सर्व कारभाराबाबत मुंबई विद्यापीठावर टीका होत होती. या सावळ्या गोंधळातच मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुपदावर कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे डॉ. देवानंद शिंदे यांची प्रभारी म्हणून नियुक्ती झाली. कोणत्याही परिस्थितीत मुंबई विद्यापीठाचा निकाल प्राधान्याने लावला जाईल, असे डॉ. शिंदे यांनी आज स्पष्ट केले. कुलगुरू डॉ. संजय देशमुख वरिष्ठांच्या आदेशानुसार सुटीवर गेल्याची चर्चा विद्यापीठ वर्तुळात रंगली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 AUG 2017
तरूण भारत

# विद्यापीठात उद्या पर्यावरणपूरक ट्री गणेश मूर्ती कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागात शनिवार, १२ रोजी दुपारी ३ वाजता पर्यावरणपूरक ट्री गणेश मूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी पर्यावरणशास्त्र अधिविभागात शुक्रवार, ११ रोजी ५ वाजेपर्यंत नाव नोंदणी करावी, असे आवाहन अधिविभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी केले आहे.

अविघटनशील प्लास्टर ऑफ पॅरीसच्या गणेशमूर्तींचे अनेक दुष्परिणाम आहेत. तसेच, मूर्तीच्या आकाराचा, रंग रंगोटीचा मूर्तीच्या देवत्वाशी संबंध नसतो. त्यापेक्षा मातीपासून तयार केलेल्या मूर्ती या अधिक निसर्गपूरक असतात. कार्यशाळेत गणेशमूर्ती तयार करताना त्याच मातीमध्ये आपल्याला हव्या त्या फुलझाडांच्या बिया रुजविल्या जाणार आहेत. तयार केलेल्या मूर्तींचे गणेशोत्सवात पूजन होईल. विसर्जनाच्या दिवसापासून मूर्तीला पाणी घातले जाईल आणि थोड्या दिवसांत त्या मातीतून आपली आवडती फुलझाडे उमलतील. या संकल्पनेवर ही कार्यशाळा आधारित आहे. कार्यशाळेसाठी कलानिकेतन महाविद्यालय येथील गौरव काइंगाडे विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या गणेशमूर्ती तयार करण्यासाठी मार्गदर्शन करतील. साधारणत: १ किलो मातीपासून ३ ते ४ लहान आकाराच्या मूर्ती तयार करता येतात. हा उपक्रम सर्वांसाठी खुला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 AUG 2017
सकाळ

# विद्यापीठात पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळा

कोल्हापूर, ता. १०: शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागात येत्या शनिवारी (ता. १२) पर्यावरणपूरक ट्री गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळा होत आहे. दुपारी तीन वाजता त्यास सुरवात होईल. अविघटनशील प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तींचे अनेक दुष्परिणाम आहेत. तसेच, मूर्तीच्या आकाराचा, रंग रंगोटीचा मूर्तीच्या देवत्वाशी संबंध नसतो. त्यापेक्षा मातीपासून तयार केलेल्या गणेशमूर्ती या अधिक निसर्गपूरक असतात. कार्यशाळेत गणेशमूर्ती तयार करताना त्याच मातीमध्ये आपल्याला हव्या त्या फुलझाडांच्या बिया रुजविल्या जातील. तयार केलेल्या मूर्तींचे गणेशोत्सवात पूजन होईल. गणेशविसर्जनाच्या दिवसापासून मूर्तीला पाणी घातले जाईल आणि थोड्या दिवसात त्या मातीतून आपली आवडती फुलझाडे उमलतील. या संकल्पनेवर ही कार्यशाळा आधारित आहे. कलानिकेतन महाविद्यालय येथील गौरव काइंगाडे विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या गणेशमूर्ती तयार करण्यासाठी मार्गदर्शन करतील. कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी पर्यावरणशास्त्र अधिविभागात उद्या (ता. ११) सायंकाळी पाच वाजेपर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन डॉ. पी. डी. राऊत यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 AUG 2017
पुढारी

# विद्यापीठात उद्या पर्यावरणपूरक कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात पर्यावरणशास्त्र अधिविभागात शनिवारी (दि.१२) पर्यावरणपूरक गणेश मूर्तीसंदर्भात कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेचा लाभ घेण्याचे आवाहन विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी केले आहे. दुपारी ३ ते ५ या वेळेत कार्यशाळा असणार आहे. कार्यशाळेस सहभागी होण्यासाठी ११ ऑगस्टच्या सायंकाळी पाच वाजेपर्यंत नाव नोंदणी करावी, असेही सांगण्यात आले आहे.

11 AUG 2017
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समाजाच्या प्रगतीत ग्रंथालयांचे योगदान

## निवृत्त ग्रंथपाल प्राचार्य डॉ. एस. आर. बाहेती यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

समाजाच्या प्रगतीमध्ये सार्वजनिक, शैक्षणिक ग्रंथालयांचे मोठे योगदान आहे, असे प्रतिपादन अकोला येथील गयादेवी जोशी महाविद्यालयाचे निवृत्त ग्रंथपाल व प्राचार्य डॉ. एस. आर. बाहेती यांनी केले.

बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या वतीने ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १२५ व्या जयंतीनिमित आयोजित एक दिवसीय कार्यशाळेमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाहेती बोलत होते. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. पी.डी. राऊत होते.

प्राचार्य डॉ. बाहेती यांनी यावेळी जुनी ग्रंथालये, ग्रंथालयशास्त्र व ग्रंथपाल हे बदलत्या काळानुसार कशी आधुनिक होत गेली याचा आढावा घेतला. तिसऱ्या सत्रामध्ये डॉ. नमिता खोत यांनी यु.जी.सी. ने ग्रंथपाल प्रवर्गासाठी नव्याने सुचविलेल्या ए. पी. आय. बाबत माहिती दिली. या चर्चासत्रामध्ये पॅनलिस्ट म्हणून प्रशांत कल्लोळी, डॉ. डी. बी. सुतार, डॉ. पी. बी. बिलावर व डॉ. एस. व्ही. थोरात यांनी सहभाग नोंदविला. यावेळी पीएच.डी. पदवी संपादन केलेल्या ग्रंथपालांचा सत्कार करण्यात आला.



कोल्हापूर : एक दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन करताना प्राचार्य डॉ. एस. आर. बाहेती. सोबत डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. एस. व्ही. थोरात आदी.

विद्यापीठातील प्राध्यापक तसेच विद्यापीठ परिक्षेत्रातील संलग्नि त महाविद्यालयातील ग्रंथपाल असे एकूण १४० प्रतिनिधी उपस्थित होते. ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक तथा समन्वयक डॉ. नमिता खोत यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सहाय्यक ग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर यांनी परिचय करून दिला. उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांनी आभार मानले.

1 1 AUG 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सार्वजनिक ग्रंथालयांचे मोठे योगदान

## एस. आर. बाहेती : शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : समाजाच्या प्रगतीमध्ये सार्वजनिक, शैक्षणिक ग्रंथालयांचे मोठे योगदान आहे, असे प्रतिपादन अकोला येथील गयादेवी जोशी महाविद्यालयाचे निवृत्त ग्रंथपाल डॉ. एस. आर. बाहेती यांनी बुधवारी केले.

ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयातर्फे आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत उपस्थित होते. उद्घाटनानंतरच्या सत्रात एडविन थॉमस इबस्को (मुंबई) व मयांक डेढिया (इन्फॉर्मेटिक्स पब्लिशिंग लिमिटेड, बंगलोर) यांनी ई-रिसोर्सवर प्रात्यक्षिकांसह माहिती दिली. विद्यापीठातील ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. नमिता खोत यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाने ग्रंथपाल प्रवर्गासाठी नव्याने सुचविलेल्या एपीआयची माहिती दिली. चर्चासत्रात पॅनलिस्ट म्हणून प्रशांत कल्लोळी, डॉ. डी. बी. सुतार, एस. व्ही. थोरात यांनी सहभाग घेतला. डॉ. नमिता खोत यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सहाय्यक ग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांनी आभार मानले. या कार्यशाळेस विद्यापीठातील प्राध्यापक, विद्यापीठ परिक्षेत्रातील संलग्नित महाविद्यालयांतील ग्रंथपाल असे १४० प्रतिनिधी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 AUG 2017
तरुण भारत

# डॉ. बापुजी साळुंखे यांना विद्यापीठतर्फे अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३० व्या स्मृतीदिनानिमित्त विद्यापीठातील डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्यास प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्तें पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, प्राचार्य पी. एस. चव्हाण, डॉ. डी. ए. देसाई, डाी. डी. सी. कांबळे, प्रा. बी. के. गोसावी, प्रा. प्रदीप पाटील, प्रा. शिल्पा भोसले, प्रा. यु. आर. हिरकुडे आदी उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 AUG 2017
महाराष्ट्र टाईम्स

## डॉ. बापूजी साळुंखे यांना अभिवादन

**कोल्हापूर :** शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३० व्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठ परिसरातील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्यास प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. याप्रसंगी विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहसचिव प्राचार्य पी. एस. चव्हाण, डॉ. डी. ए. देसाई, डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. संदीप पाटील, प्रा. शिल्पा भोसले, प्रा. यु. आर. हिरकुडे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 AUG 2017

महाराष्ट्र टाईम्स

## ग्रामीण पत्रकारिता प्रवेश

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठांतर्गत आजीवन अध्ययन, विस्तार विभाग व महावीर महाविद्यालय यांच्या संयुक्तपणे राबविण्यात येणाऱ्या 'ग्रामीण पत्रकारिता संवाद व जनसंपर्क माध्यमे' प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठीचे प्रवेश सुरू झाले आहेत. अभ्यासक्रमाचा कालावधी सहा महिन्यांचा आहे. या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांनी या अभ्यासक्रमाचे प्रकल्प अधिकारी प्रा. डॉ. बाबासाहेब उलपे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.